मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543





रुबिना मुल्ला

कार्यकारी संपादिका

9890879757



वर्ष ७वे | अंक :२९ | रविवार दि.१९ ऑक्टोबर ते शनिवार २५ ऑक्टोबर २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४



पान २ संपादकीय — सगुण-निर्गुण: गुणातीत

पान ३ — अचानक दारू सोडल्यावर काय होतं?.

पान ४ — 'वसई-विरार मनपा प्रशासनावर प्रश्नचिन्ह


## वसई–विरार : वालीव प्रभागात भूमाफिया राधेश्याम यादवचे अनधिकृत बांधकाम - प्रिया फाउंडेशनचा तीव्र निषेध

वसई–विरार (प्रतिनिधी): वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव प्रभागातील सर्वे नं. १५६/३ अथवा १५६/४ मधील जागेवर भूमाफिया राधेश्याम यादव या व्यक्तीने उघडपणे अनधिकृत बांधकाम सुरू केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकरणाविरोधात प्रिया फाउंडेशनने तीव्र निषेध व्यक्त करत महानगरपालिका व पोलिस प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.सणाच्या सुट्टीचा गैरफायदा घेऊन बांधकाम सुरू तक्रारीनुसार, राधेश्याम यादव याने सर्वे क्रमांक १५६/३ अथवा १५६/४ मधील जागेवर फाउंडेशन टाकून गाळे आणि चाळी उभारण्याचे काम सुरू केले आहे.शनिवार–रविवार आणि सणासुदीच्या सुट्ट्यांचा गैरफायदा घेत, हे बांधकाम रात्री-दिवस सुरू ठेवले जात आहे, ज्यामुळे प्रशासकीय कारवाई टाळण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.ही कामे पूर्णतः बेकायदेशीर असल्याचे तक्रार अर्जात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणामुळे शासनाचा महसूल बुडतो आहे आणि भूमाफियांचा मनोबल वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.सुप्रीम कोर्टाचे आदेश धाब्यावर! प्रिया फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा प्रिया भट्टाचार्य यांनी सांगितले,



'सुप्रीम कोर्टाचे स्पष्ट आदेश आहेत की अनधिकृत बांधकामांना घरपट्टी, पाणीपट्टी किंवा विजेचे कनेक्शन देऊ नये. तरीदेखील स्थानिक प्रशासन जाणीवपूर्वक या प्रकरणांकडे दुर्लक्ष करत आहे. हे सुप्रीम कोर्टाच्या आदेशांचा अवमान असून लोकशाहीवर थेट प्रहार आहे.'त्यांनी पुढे म्हटले, 'जेव्हा प्रशासन माफियांना पाठीशी घालते, तेव्हा सर्वसामान्य नागरिकांचा कायद्यावरील विश्वास ढळतो. हे न्यायव्यवस्थेचा अपमान असून यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे.'प्रिया फाउंडेशनची मागणी-प्रिया फाउंडेशनने वसई–विरार महापालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (अतिक्रमण), प्रमुख **CUC** विभाग, सह–आयुक्त (वालीव प्रभाग) तसेच पोलीस उपायुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक (वालीव पोलीस स्टेशन) यांना सविस्तर लेखी तक्रार दिली आहे.

तक्रारीत मागणी करण्यात आली आहे की — या अनधिकृत बांधकामावर तात्काळ तोडक कारवाई (**demolition**) करण्यात यावी, भूमाफिया राधेश्याम यादव याच्यावर गुन्हा दाखल करून कठोर ँए कारवाई करण्यात यावी,

तसेच संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून विभागीय कारवाई करण्यात यावी.

कारवाई न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा-प्रिया फाउंडेशनने स्पष्ट इशारा दिला आहे की,

'जर या तक्रारीवर तात्काळ आणि ठोस कारवाई करण्यात आली नाही, तर प्रिया फाउंडेशन कायद्याच्या चौकटीत राहून कायदेशीर लढाई आणि जनआंदोलन उभारेल.'




वसई तालुक्यातील पोमण, सारजामोरी, जूचंद्र, ससूनवघर आणि मालजीपाडा परिसरात बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या डांबर व **R.M.C.** प्लांटच्या प्रदूषणामुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः संकटात आले आहे. स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी व सामाजिक संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्लांटमधून धूर, रासायनिक वायू, आणि ध्वनी प्रदूषण इतक्या प्रमाणात होते की श्वास घेणेदेखील कठीण झाले आहे. पर्यावरण संरक्षण कायद्यांचे उघड उल्लंघन पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६, वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९८१, तसेच जल प्रदूषण अधिनियम १९७४ यांचे हे सरळ उल्लंघन आहे.

तरीसुद्धा, या सर्व प्लांटचे संचालन स्थानिक प्रशासन, महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (**MPCB**) यांच्या नजरेआड कसे राहिले, हा मोठा प्रश्न आहे.

कायद्याशिवाय सुरू असलेले औद्योगिक साम्राज्य

स्थानिक स्रोतांच्या माहितीनुसार, अनेक प्लांट कोणत्याही वैध परवानगीशिवाय चालवले जात आहेत.

सदर प्लांटमागे काही मुंबईस्थित


पान नं.२वर


## धम्मदीप रमाई प्रतिष्ठान वसईत बौद्ध ग्रंथ वाटप उपक्रम यशस्वी

धम्मदीप रमाई प्रतिष्ठान वसई यांच्या वतीने चक्रवर्ती सम्राट अशोक विजयादशमी आणि ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी धम्मदीप बुद्ध विहारात बौद्ध ग्रंथ व पुस्तके वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारांचा प्रसार करून समाजात धम्म शिक्षण, ज्ञान आणि समानतेचा संदेश पोहोचविणे होय.



कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवर आणि समाजबांधवांना बौद्ध धर्मातील तत्त्वज्ञान, करुणा, मैत्री आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व सांगण्यात आले.


पान नं.२वर

# संपादकीय...!

## सगुण-निर्गुणः गुणातीत

देह, मन, बुद्धी यांत रज, तम, सत्त्व हे तिन्ही गुण आहेत आणि हे गुण त्यांना सोडू शकत नाहीत. मात्र, या गुणांमध्ये देह परिवर्तन नक्की करू शकतो.मनुष्याला निर्गुण, गुणातीत कसे होता येईल? निर्गुण म्हणजे काय, तर गुणांचा अभाव. आणि गुणांपासून मुक्त होणे म्हणजेच गुणातीत होणे. गुण असूनही त्यांच्यापासून दूर होणे किंवा त्यांना पार करणे, हे येथे अध्याहृत आहे.सत्त्वगुण वाढवून रज व तम गुण कमी करणे किंवा रज वाढवून सत्त्व आणि तम गुण कमी करणे, हे शक्य आहे. प्रत्येक जण दिवसभरात हे करीतच असतो. साक्षी, चैतन्यशक्तीला गुणातीत बनवायची आवश्यकता नाही. आत्मा सुरुवातीपासूनच गुणातीत आहे. देह मात्र गुणातीत होऊ शकत नाही. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, अहंकाराबरोबर आपले जे तादात्म्य आहे आणि देह, मन व बुद्धी यांच्याबरोबर आपली जी ओळख आहे, ती सर्वप्रथम मिटवावी लागेल. आत्मा आणि चैतन्यशक्तीबरोबर स्वतःची ओळख ठेवावी लागेल. साक्षी, आत्मा, चैतन्यशक्ती यांच्याबरोबरच स्वतःला पाहा, म्हणजे या देहास गुणातीत बनण्याची गरजच उरणार नाही.मी म्हणजे देह, मन, बुद्धी नसून, मी साक्षी आहे, ही जाणीव सदैव जागी ठेवल्यास, आपण स्वतःला गुणातीत बनवू शकतो. एखादी कन्या विवाहानंतर पित्याच्या घरून पतीकडे जाते, तेव्हा ती पतीच्या घरालाच स्वतःचे घर मानते आणि पित्याचे घर आता आपले नाही, असा विचार मनात ठसवते. येथे ती पूर्वी होती तीच आहे; फक्त तिच्या विचारात बदल झाला आहे.त्याचप्रमाणे आपण स्वतःला जे देह, मन, बुद्धी समजतो ते त्याप्रमाणे न समजता, स्वतःला साक्षी, आत्मा, चैतन्यशक्ती असे समजायला हवे. अशी जाणीव नित्य होणे, सतत होणे म्हणजेच गुणातीत होणे. थोडक्यात, त्या विवाहित कन्येप्रमाणे विचारांत बदल व्हायला हवा. तो झाला, की गुणातीत होणे शक्य होते.




## वसईतील पोमण–सारजामोरी–जूचंद्र परिसरात'...पान नं.१

व्यावसायिक मालक असल्याचे सांगितले जाते, आणि स्थानिक गुंडगिरी व राजकीय संरक्षणाच्या छत्राखाली हे सर्व सुरु आहे, असा आरोपही करण्यात आला आहे.

या प्लांटमुळे मिळणाऱ्या 'मोठ्या नफ्याचा' वाटा काही स्थानिक नेते आणि अधिकाऱ्यांपर्यंत जात असल्याची शक्यताही स्थानिकांकडून वर्तवली जाते.

नागरिकांचा श्वास रोखणारे प्रदूषण

परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी दिलेल्या साक्षीनुसार —

हवेमध्ये सतत काळा धूर व रासायनिक वास जाणवतो.
अनेकांना दम्याचे झटके, खोकला, त्वचा विकार व डोळ्यांची जळजळ जाणवत आहे.
रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या प्लांटमुळे ध्वनी प्रदूषण व मानसिक ताण निर्माण झाला आहे.
काहींना भूजल दूषित झाल्याचा संशय असून पिण्याच्या पाण्यातही वास जाणवतो.
नागरिकांचा सवाल — 'शासन झोपले आहे का?'
स्थानिक रहिवासी विचारतात,
'जेव्हा सर्वकाही खुलेआम चालू आहे — धूर, ट्रकांची वर्दळ, रात्रीचा आवाज — तरीही स्थानिक प्रशासन, श्ङ्गँ आणि पोलिस का शांत आहेत? कोणाचे संरक्षण आहे या उद्योगांना?'
अशा प्रकारे जनतेचा विश्वास आणि कायद्याची अंमलबजावणी दोन्हीही धोक्यात आले आहेत.

तज्ञांच्या मते, या प्रकरणात भारतीय दंड संहिता (IPC) व नवीनँए कलमानुसार पुढील गुन्हे लागू होऊ शकतात —
कलम २६९, २७० : सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणे
कलम ३३६ ते ३३८ : निष्काळजीपणे लोकांच्या जीवाला धोका
कलम ४२५, ४२६ : सार्वजनिक मालमत्तेला हानी
त्यामुळे, प्रशासनाने या प्लांट्सविरोधात गुन्हा नोंदवून तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.
नागरिकांची मागणी स्पष्ट-अनधिकृत प्लांट्सची तात्काळ तपासणी व बंदी.
**MPCB** कडून स्वतंत्र **EIA (Environmental Impact Assessment)** अहवाल प्रसिद्ध करणे.
स्थानिक स्तरावर आरोग्य शिबिरे व वैद्यकीय मदत पुरविणे.
तक्रारदार व साक्षीदारांना पोलीस संरक्षण देणे.
नियमभंगास सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर चौकशी व कारवाई करणे.
वसईच्या या औद्योगिक सावलीखाली पर्यावरण आणि नागरिकांचे आरोग्य दोन्ही हळूहळू गुदमरते आहे.
शासन आणि संबंधित विभागांनी या प्रकरणाकडे केवळ 'तक्रार' म्हणून नव्हे तर सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणीय आपत्ती म्हणून पाहिले पाहिजे.
अनधिकृत नफा थांबवून जीव व निसर्ग वाचवणे हाच खरी विकासाची कसोटी ठरेल.

## धम्मदीप रमाई प्रतिष्ठान... पान नं.१

धम्मदीप रमाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा स्मिता मनोहर–पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की,
'बुद्ध आणि आंबेडकर यांच्या विचारांची खरी अंमलबजावणी ज्ञानाच्या माध्यमातूनच शक्य आहे. पुस्तक आणि ग्रंथ हे परिवर्तनाचे प्रभावी साधन आहेत. म्हणून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत हे विचार पोहोचविणे आमचे ध्येय आहे.'
या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे पदाधिकारी विकी कांबळे, सनी मनोहर, अपेक्षा भाताणकर, दीक्षा मेश्राम व कल्पना नलावडे यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.
कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांनी या सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले.
धम्मदीप रमाई प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे बौद्ध धम्म, शिक्षण आणि आंबेडकरी विचारधारा समाजात अधिक प्रभावीपणे पोहोचेल, तसेच नव्या पिढीत ज्ञान, समानता आणि बंधुत्वाची भावना दृढ होईल.

## अचानक दारू सोडल्यावर काय होतं?.पान नं.३.

सुरक्षित मानली जाते, तीही निरोगी यकृत असणाऱ्या व्यक्तीसाठी.'पण वास्तवात हे स्वतःवर नियंत्रण ठेवणं जवळजवळ अशक्य असतं.दारूमध्ये व्यसनाधीनतेचा गुणधर्म असल्यामुळे हळूहळू प्रमाण वाढत जातं आणि शरीर त्याची मागणी करू लागते. त्यामुळे दारू पूर्णपणे टाळणं हेच सर्वात सुरक्षित आहे.दारू अचानक सोडल्यावर काय होतं?दारूचं व्यसन अनेक वर्षं असलेले लोक जेव्हा अचानक दारू सोडतात, तेव्हा शरीर आणि मेंदूवर मोठा परिणाम होतो. यालाच विड्रॉवल सिंड्रोम (Withdrawal Syndrome) म्हणतात. प्रमुख लक्षणंःहातपाय थरथरणं झोप न लागणं तणाव आणि गोंधळलेपणा भ्रम (कानात आवाज येणे, कोणी बोलतंय असं वाटणे) थकवा आणि चिडचिडेपणा जर दारू सोडल्यानंतर या लक्षणांकडे दुर्लक्ष केलं, तर मेंदूवरील गंभीर विकार जसे की Delirium Tremen किंवा कोरशॉफ सिंड्रोम होऊ शकतात.यकृत पुन्हा पूर्ववत होऊ शकतं का? जर दारूचं नुकसान सुरुवातीच्या टप्प्यात (फॅटी लिव्हर किंवा फायब्रोसिस) असेल, तर दारू सोडल्याने यकृत बरे होऊ शकते.पण जर नुकसान सिऱ्हॉसिसच्या टप्प्यापर्यंत गेलं असेल, तर यकृत पूर्णपणे पूर्ववत होत नाही.तरीही दारू पिणं थांबवल्यानं नुकसान वाढत नाही, आणि आयुष्य वाचू शकतं. मानसिक परिणाम आणि सामाजिक तोटेदारू पिणाऱ्या व्यक्तींचं केवळ आरोग्यच नाही, तर कुटुंब, आर्थिक स्थैर्य, आणि सामाजिक जीवन उद्ध्वस्त होतंदारूच्या प्रभावाखाली हिंसाचार, अपघात, आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढते.भारतात दरवर्षी दारूमुळे थेट किंवा अप्रत्यक्ष मृत्यूंची संख्या लाखोंच्या घरात पोहोचली आहे.व्यसनमुक्ती केंद्र आणि उपचा व्यसनमुक्ती केंद्र उपयुक्त आहेत का? डॉ. थिआगराजन सांगतात —जबरदस्तीने कोणाचंही व्यसन सोडवता येत नाही. त्यासाठी व्यक्तीचा निश्चय आणि वैद्यकीय उपचार दोन्ही आवश्यक आहेत.'काही केंद्रे वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली चालतात. मात्र अनधिकृत केंद्रांवर छळ आणि अत्याचार होतात, म्हणून लोकांनी राज्य मानसिक आरोग्य आयोगाकडून मान्यता असलेली केंद्रे निवडावीत.सरकारी मदतःतामिळनाडू आणि महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये सरकारने फ्री व्यसनमुक्ती योजना सुरू केल्या आहेत यात –१० ते ३० दिवसांचे औषधोपचार समुपदेशन (Counselling) मानसोपचार (Psychotherapy) कुटुंबीयांचा सहभाग यांचा समावेश आहे. दारूमुक्त आयुष्य — शक्य आहे!दारू सोडणं अवघड असलं तरी अशक्य नाही पहिलं पाऊल म्हणजे स्वतःची जाणीव — 'मला मदत हवी आहे' हे स्वीकारणं योग्य वैद्यकीय उपचार, मानसोपचार आणि कुटुंबाचा आधार मिळाल्यास व्यक्ती पूर्णपणे व्यसनमुक्त जीवन जगू शकत दारूचा कोणताही थेंब सुरक्षित नाही. अचानक दारू सोडल्यास वैद्यकीय सल्ला घेणं अत्यावश्यक आहे. व्यसनमुक्ती केंद्र आणि डॉक्टरांची मदत घ्या. कुटुंबाचा आधार आणि मानसिक स्थैर्य हाच सर्वात मोठा उपचार आहे.दारूच्या एका ग्लासापेक्षा तुमचं जीवन, तुमचं आरोग्य आणि तुमचं कुटुंब अधिक मौल्यवान आहे.आजच निणय घ्या — दारू नाही, आयुष्य निवडा!

## मोबाईल हॅक, ब्लॅकमेल आणि अश्लील व्हिडीओचा धक्का — कल्याणमधील तरुणीची संसाराशी खेळणारी कहाणी!



कल्याण – माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे. खडकपाडा **(Khadakpada)** पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणाने आपल्या प्रेयसीचा मोबाईल हॅक करून तिचे खासगी व्हिडीओ बनवले आणि तिला तसेच तिच्या कुटुंबाला ब्लॅकमेल केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अधिक धक्कादायक म्हणजे, आरोपी हा एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी असल्याची माहिती समोर आली आहे.लग्नाचं आमिष आणि लैंगिक शोषण२९ वर्षीय पीडित तरुणी आणि आरोपी एकमेकांच्या संपर्कात आले आणि त्यांच्यात प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवत तिच्यासोबत अनेकदा शारीरिक संबंध ठेवले. या काळात त्याने तिच्या नकळत तिचे खासगी क्षण मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले.मोबाईल हॅक करून नजर ठेवलीघटनेनंतर आरोपीने पीडितेचा मोबाईल हॅक केला आणि तिच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवायला सुरुवात केली. तो सतत तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळे पीडितेचे वैयक्तिक आयुष्य पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.ब्लॅकमेल आणि कुटुंबीयांना धमक्यायानंतर आरोपीने त्या खासगी व्हिडीओंचा गैरवापर करून पीडितेला सतत ब्लॅकमेल केले. तिच्या आई-वडिलांना आणि भावालाही हे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत जीवे मारण्याचाही इशारा दिला.एका दिवशी योगायोगाने पीडितेच्या हाती आरोपीचा मोबाईल आला. त्यातून धक्कादायक गोष्ट समोर आली — त्यात केवळ तिचेच नाही, तर अनेक मुलींचे अश्लील व्हिडीओ सापडले!सत्य बाहेर आलं, आरोपी फरारहे पुरावे मिळाल्यानंतर पीडितेने तो मोबाईल स्वतःकडे ठेवला. पण त्यामुळे आरोपी संतापला आणि कुटुंबीयांना धमकावत पोलिसांकडे जाऊन पीडितेवरच मोबाईल चोरीचा खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला.मात्र, खडकपाडा पोलिसांनी तपास केला असता संपूर्ण सत्य उघडकीस आलं. आरोपीच्या मोबाईलमध्ये अनेक अश्लील व्हिडीओ मिळाले असून त्याच्याविरोधात गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सध्या तो फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पोलीस तपास सुरूया प्रकरणात पोलिसांनी सायबर विभागाच्या मदतीने तांत्रिक पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. पोलिस सूत्रांनुसार, आरोपीने अनेक मुलींचा गैरफायदा घेतल्याची शक्यता वर्तवली जात आहे.ही घटना पुन्हा एकदा अधोरेखित करते की – डिजिटल युगात विश्वासघात आणि सायबर गुन्हे किती वेगाने वाढत आहेत.महिलांनी मोबाईल, सोशल मीडियावर आपली वैयक्तिक माहिती शेअर करताना विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचं पोलिसांनीही आवाहन केलं आहे.

## फटाके भारतात कसे आणि कधी आले? सर्वात आधी कुठे झाली फटाके फोडायची सुरुवात?

दिवाळी म्हटलं की फटाके आपोआप आठवतात.पण, दिवाळी आणि फटाक्यांचा संबंध काय? दिवाळी तशी भारतात अनादीकाळापासून साजरी केली जात आहे. पण मग फटाके कधी याचा भाग झाले? आणि फटाके कुठून आले? हेच आपण आता जाणून घेणार आहोत.

पौराणिक ग्रंथ आणि मिथकांचा अभ्यास केला तर लक्षात येतं की फटाक्यांचा उगम आपल्या संस्कृतीत झालेलाच नाही.प्राचीन ग्रंथांनुसार दिवाळी हा आनंदाचा, प्रकाशाचा सण आहे. पण फटाक्यांसारख्या मोठ्या आवाजाच्या कुठल्याही वस्तूचा उल्लेख नाही.मोठ्या आवाजाच्या फटाक्यांची परंपरा चीनमध्ये होती. फटाक्यांच्या प्रचंड आवाजामुळे वाईट विचारांना मूठमाती मिळेल आणि समृद्धी नांदू लागेल, अशी चीनी लोकांची श्रद्धा होती.आतिश दीपांकर नावाच्या बंगाली बौद्ध धर्मगुरुंनी १२व्या शतकात चीनमधली ही संस्कृती भारतात आणल्याचा तर्क आहे. चीन, तिबेट आणि पूर्व आशियातून त्यांनी हे आत्मसात केलं असावं, अशी शक्यता आहे.ऋग्वेदानुसार दुर्भाग्य आणणाऱ्या निऋतीलाही देवी मानण्यात आलं होतं, आणि तिला दिकपालाचा (दिशांच्या नऊ देवतांपैकी एक) दर्जा देण्यात आला होता.या देवीची प्रार्थना करण्यात येते. तिने परत जावं अशी प्रार्थना करण्यात येते. तू पुन्हा येऊ नकोस, असंही सांगितलं जातं. फटाक्यांच्या मोठ्या आवाजाने तिला घाबरवून परत पाठवावं असं कुठेही म्हटलेलं नाही मात्र तरीही भारतात प्राचीन काळापासून प्रकाश आणि मोठ्या आवाजांचे फटाके होते.दोन हजार वर्षांपूर्वीच्या मिथकांमध्ये फटाक्यासारख्या गोष्टींचा उल्लेख आहे.इसवीसनपूर्व काळातला प्रसिद्ध ग्रंथ कौटिल्य अर्थशास्त्रात एका चूर्णाचा संदर्भ आहे, जे वेगानं पेट घेऊन ज्वाळा प्रज्वलित होतात. या रसायनाला एका नळीत बंद केलं तर त्यापासून फटाका तयार व्हायचा.बंगालमध्ये पावसाळ्याचा हंगाम संपल्यानंतर शेतात क्षारयुक्त रसायनांचा थर जमा होत होता. हा थर दळल्यावर त्वरित पेटणारा ज्वलनशील पदार्थ तयार व्हायचा.यामध्ये गंधक (सल्फर) आणि योग्य प्रमाणात कोळसा मिसळला तर या मिश्रणाची ज्वलनशीलता वाढायची.ज्या भागात जमिनीवर साठलेले क्षार नव्हते, तिथे लाकडाच्या भुशापासून तयार झालेला पदार्थ वापरला जायचा. आजार बरे करण्यासाठी वैद्य मंडळी या पदार्थाचा वापर करत असत.जवळपास संपूर्ण देशभर हे चूर्ण बनवण्यासाठी लागणाऱ्या वस्तू मिळायच्या. पण फटाक्यांच्या निर्मित्तीसाठी याचा उपयोग होत असेल, याला दुजोरा मिळू शकला नाही.आनंद आणि जल्लोषासाठी प्रकाशाच्या विविध गोष्टींचा उपयोग तेव्हा व्हायचा. तुपापासून तयार झालेल्या दिव्यांचा उल्लेखही आपल्या साहित्यात आढळतो.आजच्या फटाक्यांमध्ये आढळणाऱ्या दारूसारख्या या मिश्रणाचा स्फोट होऊन मोठ्ठा आवाज व्हायचा, पण त्याची ज्वलनशीलता कमी असल्यानं ते एखाद्या लढाईत शत्रूविरुद्ध वापरणं शक्य नव्हतं. तशा विध्वंसक गनपावडरचा पहिला उल्लेख १२७० मध्ये सीरियातले रसायनशास्त्रज्ञ हसन अल रम्माह यांनी आपल्या पुस्तकात केला आहे. गरम पाण्यानं या गनपावडरला शुद्ध करून आणखी विस्फोटक करण्याबाबतही त्यांनी लिहिलं होतं. मग मुघलांनी आणले का?१५२६मध्ये बाबरने दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोधीवर आक्रमण केलं. इतिहासकार सांगतात की त्यावेळी बाबराच्या सैन्याच्या तोफांचा गडगडाट ऐकून लोधीचे सैनिक, खासकरून त्याच्या सैन्यातले हत्ती घाबरले होते.त्याकाळी जर मंदिरं आणि शहरांमध्ये फटाके फोडण्याची परंपरा असती, तर या मोठ्या आवाजाने लोधीचे सैनिक अस्वस्थ झाले नसते.पण मुघलांच्या इतिहासाचे अभ्यासक प्राध्यापक नजफ हैदर यांच्यामते फटाके मुघलांच्या आधीपासूनच होते. मुघलांच्या काळात आतिषबाजी आणि फटाक्यांचा भरपूर वापर होत होता, हे माहिती होतंच.पण भारतात फटाके मुघल घेऊन आले होते, हे म्हणणं योग्य नाही. कारण ते आधीच आले होते.अशा पेंटिंग पण आहेत. दारा शिकोहच्या लग्नाच्या पेंटिंगमध्ये लोक फटाके फोडतांना दिसतात. पण हे मुघालांच्या आधीसुद्धा होते.फिरोजशाहच्या काळातसुद्धा खूप आतिषबाजी व्हायची.गन पावडर नंतर भारतात आली. पण मुघलांच्या आधी भारतात फटाके नक्कीच आले होते.

हत्तींच्या झुंजीत किंवा शिकारीच्या वेळी त्यांचा बराच वापर व्हायचा. खरंतर घाबरवण्यासाठीच फटाक्यांचा वापर जास्त प्रमाणात व्हायचा.

मुघलांच्या काळात लग्न किंवा उत्सवामध्येही आतशबाजी होत असे.

## अचानक दारू सोडल्यावर काय होतं? दररोज किती दारू पिणं सुरक्षित असतं?

दारूचं व्यसन ही केवळ सवय नाही, तर ती शारीरिक आणि मानसिक दोन्ही स्तरांवर घातक आजार आहे. अनेकांना वाटतं की ‘थोडीशी दारू काही नुकसान करत नाही,’ पण विज्ञान आणि वैद्यकीय तज्ञांचे मत यापेक्षा पूर्णपणे वेगळं आहे.

दारू पिणं अचानक थांबवलं तर शरीरावर काय परिणाम होतात, दररोज किती दारू पिणं सुरक्षित आहे, आणि व्यसनमुक्ती कशी शक्य आहे — या सर्व गोष्टी या लेखातून सविस्तर जाणून घेऊया.दारूचं शरीरावर होणारं प्रवास आणि नुकसान दारू पिण्याचं प्रमाण कमी असो की जास्त — तिचा परिणाम शरीरातील सर्व महत्त्वाच्या अवयवांवर होतो.एमजीएम हेल्थकेअरचे किडनी प्रत्यार्पण तज्ज्ञ डॉ. थिआगराजन यांच्या मते –‘दारू शरीरासाठी नेहमीच घातक असते. किती प्रमाणात आणि किती वेळा पिता यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे — दारूचा एकही थेंब शरीरात गेला की नुकसान सुरू होतं.’दारू शरीरात जाते कुठे?पिल्यानंतर दारू थेट पोटातून छोट्या आतड्यात जाते.तिथं ती अल्डीहाईड नावाच्या घातक रसायनात रूपांतरित होते.हे रसायन रक्ताद्वारे यकृत (लिव्हर) मध्ये पोचतं.यकृताचं मुख्य काम म्हणजे रक्त शुद्ध करणं, पण अल्डीहाईडच्या संपर्कामुळे यकृताच्या पेशींचं नुकसान सुरू होतं.जास्त दारू घेतल्यास यकृताची क्रिया पूर्णपणे बंद पडू शकते.

महिलांना अधिक धोका का?डॉ. थिआगराजन सांगतात की महिलांची जनुकीय रचना पुरुषांपेक्षा वेगळी असल्यामुळे दारूचे परिणाम त्यांच्यावर अधिक तीव्र होतात. दारू सतत प्यायल्यामुळे यकृतातील पेशींवर डाग पडतात (फायब्रोसिस). हळूहळू या पेशी जाड होतात, लवचिकता कमी होते आणि शेवटी सिऱ्हॉसिस म्हणजेच यकृत निकामी होऊ लागतं.महिलांमध्ये हे आजार अधिक जलद गतीने वाढतात आणि त्याचे परिणाम गंभीर असतात.दारू आणि मेंदू — मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम दारू हा नसांवर थेट परिणाम करणारा पदार्थ आहे. दीर्घकाळ दारू घेतल्याने मेंदूची कार्यक्षमता कमी होते.

किल्पक्कम सरकारी मानसोपचार हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. पूर्णी चंद्रिका सांगतात की –‘दारू पिणाऱ्या लोकांमध्ये मानसिक आजारांची शक्यता सामान्य लोकांपेक्षा दुप्पट असते.’मेंदूवरील दुष्परिणामः स्मरणशक्ती कमी होणं

झोप न लागणं चिडचिडेपणा आणि आक्रमकता आवाज किंवा भ्रम जाणवणे **(Hallucinations)**

दीर्घकाळात **Wernicke–Korsakoff Syndrome –** म्हणजे स्मरणशक्ती आणि समजण्याची क्षमता हरपणंदारूमुळे होणारे प्रमुख यकृत आजारफॅटी लिव्हर (Fatty Liver)

– यकृताच्या पेशींमध्ये चरबी साठते.

– सुरुवातीला लक्षणं नसतात, पण पुढे जाऊन यकृताचं कामकाज बिघडतं.अल्कोहोलिक हेपॅटायटिस **(Alcoholic Hepatitis)**

– दारूचं अतिसेवन आणि चुकीचा आहार यामुळे यकृतात सूज येते.

– कावीळ, पोटदुखी, थकवा, आणि रक्ताच्या गुठळ्या होणं ही प्रमुख लक्षणं.

सिऱ्हॉसिस **(Cirrhosis of Liver)**

– दीर्घकाळ दारू

घेतल्यामुळे यकृतातील पेशी नष्ट होतात.परिणामी शरीरात विषारी घटक साचतात, आणि शेवटी मृत्यूही होऊ शकतो.दररोज किती दारू पिणं सुरक्षित?

डॉ. थिआगराजन सांगतात —‘फक्त ३० मिली दारू दररोज

पान नं.२वर

# महाभारतातील ‘कर्ण’ पंकज धीर यांचं निधन - कलाविश्वात शोककळा!

मनोरंजनविश्वातून अतिशय दुःखद बातमी आली आहे. दूरदर्शनवरील ऐतिहासिक मालिका महाभारत मधील ‘कर्ण’ म्हणून प्रसिद्ध झालेले ज्येष्ठ अभिनेते पंकज धीर यांचं निधन झालं आहे. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंकज धीर गेल्या काही महिन्यांपासून कॅन्सरशी झुंज देत होते. काही काळ त्यांनी आजारावर मात केली होती, पण अलीकडे त्यांची तब्येत पुन्हा बिघडली. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता त्यांचं निधन झालं.

महाभारतात अर्जुनाची भूमिका साकारणारे अभिनेते फिरोज खान यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही दुःखद बातमी दिली. त्यांनी लिहिलं — ‘गुड बाय जेन्टलमन, तुझी



खूप आठवण येईल पीडी.’

पंकज धीर यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीत अनेक ऐतिहासिक आणि सामाजिक भूमिका साकारल्या. पण ‘महाभारतातील कर्ण’ ही त्यांची भूमिका प्रेक्षकांच्या मनात आजही जिवंत आहे. त्यांच्या प्रभावी संवादशैली, भावनांची अभिव्यक्ती आणि व्यक्तिमत्त्वामुळे त्यांनी कर्ण या पात्राला वेगळं आयुष्य दिलं.

काही महिन्यांपूर्वी त्यांनी मोठी सर्जरीही केली होती. आजाराशी झुंज देताना ते मानसिकदृष्ट्या अत्यंत खंबीर राहिले, पण अखेरीस त्यांनी या लढाईत माघार घेतली. त्यांच्या जाण्याने दूरदर्शनच्या सुवर्णकाळातील एक तेजस्वी पर्व संपल्याची भावना चाहत्यांमध्ये आहे.

विशेष म्हणजे, सुरुवातीला महाभारत चे दिग्दर्शक बी.आर. चोप्रा यांनी पंकज धीर यांना ‘अर्जुन’च्या भूमिकेसाठी निवडले होते. पण त्या भूमिकेसाठी त्यांना मिश्या काढाव्या लागणार होत्या, हे समजल्यावर त्यांनी नकार दिला. नंतर चोप्रा यांनी त्यांना ‘कर्ण’ची भूमिका दिली — आणि हाच निणय त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला.

आजही महाभारत मालिकेच्या पुनर्प्रसारणावेळी प्रेक्षक त्यांच्या संवादांवर टाळ्या वाजवतात — आणि त्यांची भूमिका भारतीय टीव्हीच्या इतिहासात सदैव अमर राहील.

पान नं.२वर

# ‘वसई-विरार मनपा प्रशासनावर प्रश्नचिन्ह — रुग्णालयातील सुरक्षेचा खेळखंडोबा’

विरार प्रतिनिधीः
वसई-विरार शहर महानगर पालिकेच्या अखत्यारीतील श्री जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, विरार पूर्व येथे रुग्ण पळून जाण्याच्या घटनांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. अलिकडच्या काळात अशा तीन घटना घडल्याचे समोर आले असून, १० ऑक्टोबर २०२५ रोजी पुन्हा एक रुग्ण रुग्णालयातून पळून गेला, अशी माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे.

सदर रुग्णाचा त्याच दिवशी मृत्यू झाल्याची स्थानिक चर्चा असून, मृत्यू झाल्यानंतर त्याला पुन्हा त्याच रुग्णालयात आणण्यात आले. परंतु मृतदेहाचे पोस्टमार्टम न करता थेट मृत घोषित करण्यात आल्याने संशयाचे ढग निर्माण झाले आहेत.

प्रशासनाचे मौन प्रश्न निर्माण करणारे
घटनास्थळी सुरक्षा रक्षक व वैद्यकीय अधिकारी उपस्थित असताना रुग्ण पळून जाणे ही गंभीर बाब आहे. यावरून रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची जबाबदारी यांच्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.
रुग्ण पळून गेल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली नाही, हे विशेष लक्षवेधी ठरत आहे.

या प्रकरणाबाबत वैद्यकीय अधिकारी आणि महानगर पालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, त्यांनी ‘असे काही घडलेले नाही’ असे सांगत हात झटकले, असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

पडद्यामागे कोणाचा हात?
सदर प्रकरण मनपा आयुक्तांच्या निदर्शनास येऊ न देता काही अधिकारी तथ्य लपवत आहेत का? असा गंभीर प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे.
संपूर्ण प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे.

जनतेची मागणी
या संदर्भात १० ऑक्टोबर २०२५ च्या ण्ण्ऊ‌ फुटेजची तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी मनपा आयुक्त व जिल्हा प्रशासनाने तातडीने करावी, अशी जनतेची मागणी आहे.
तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे आवाहन नागरिकांनी केले आहे.










## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in